7

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTEC E-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk3@dte.org.in

क्र:३/तंशिसं/आटीसेल-**डिसीएफ**-III/२०१६/ 13

दिनांक : 06/02/2016

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

**मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/**

**अमरावती/नागपूर.**

**विषय :- अखिल भारतीय उच्च व शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१४-१५ व २०१५-१६ संलग्नित महाविद्यालयांनी डिसीएफ फार्म-III अपलोड करणेबाबत. . .**

संदर्भ :- १. या संचालनालयाचे पत्र क्र.३/तंशिसं/AISHE/२०१५-१६/७६,दि.१७ डिसें. २०१५.

२. उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.उंशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/ २०१५-१६/६७९, दि. १९ जाने. २०१६.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र. १ दिनांक १७ डिसें. २०१५ रोजीच्या पत्राचे कृपया अवलोकन करावे.

उच्च शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांनी आपल्या अंतर्गत येणा-या संस्थांचे डिसीएफ -III फार्म भरुन अपलोड करण्याकरीता संदर्भ क्र. १ दिनांक १७ डिसें. २०१५ रोजीच्या पत्रा अन्वये दिलेल्या सूचनेचे पालन करुन फार्म भरण्याकरीता कळविण्यांत आले होते. परंतु

संस्थांनी विषयाकिंत माहिती अद्यापर्यंत अपलोड केलेली नाही. असे संदर्भ क्रमांक २ दिनांक १९ जाने. २०१६ अन्वये उच्च शिक्षण संचालनालयाने कळविलेले आहे. पत्राची प्रत सोबत जोडत आहे.

तरी आपणास कळविण्यांत येते की, आपल्या अधिनस्त असणा-या शासकीय, अनुदानित व विना-अनुदानित कायम विना-अनुदानित पदवीका, पदवी, पदवी-पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमधील अभ्यासक्रमाची व इतर बाबतची विषयांकित सविस्तर माहिती डिसीएफ -III फार्म भरुन www.aishe.gov.in या वेबपोर्टलवर त्वरीत अपलोड करण्याबाबत आपल्या स्तरवरुन कळविण्यांत यावे. सदरहू माहिती अपलोड करण्याकरिता दिनांक २८ फेब्रु. २०१६ हि अंतिम मुदत आहे.

सदरहू माहिती भरण्याकरीता सर्व मार्गदर्शक सूचना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या वेबपोर्टल वर उपलब्ध आहे. संस्थांनी माहिती डाऊनलोड करुन त्यानुसार माहिती विहित मुदतीत भरुन घेण्याबाबत संस्थांना आपल्या स्तरावरुन कळवावे. तसेच जर संस्थांनी तद्संबंधीची माहिती वेबपोर्टेलवरुन भरल्यास व त्याबाबत शासन स्तरावरुन किंवा उच्च शिक्षण संचालनालयाकडून काही प्रश्न उद्भवल्यास स्वतः सर्वसी संस्था जबाबदार राहील याची नोंद घेण्याबाबत कळविण्यांत यावे. व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास दिनांक २९ फेब्रु. २०१६ पर्यंत संचालनालयास पाठविण्यांत यावा.

( डॉ. सुभाष महाजन )

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, ३ बी. जे. रोड, सेन्ट्रल बिल्डिंग, पुणे – ४११ ००१. यांना माहिती करीता.

---

पृष्ठांकन क्र.तंशिसं/प्राकाना/एआयएसएचई/२०१६/ 329
दिनांक : - 8 FEB 2016

प्रति,

संचालक/प्राचार्य
सर्व शासकीय, अनुदानित व विना अनुदानित पदवी, पदव्युत्तर पदवी, तसेच पदविका संस्था
नागपूर विभाग, नागपूर.

उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यांत येवून त्याचा अहवाल दिनांक २५ फेब्रूवारी २०१६ पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

**(गुलाबराव ठाकरे)**
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर